# ग्रामपंचायत पिंपळगाव बु. ता.पाचोरा जि.जळगाव
## ई-निविदा सुचना क्र.०१ -२०२६/२७ ( पहिली वेळ)

प्रकाशक, ग्रामपंचायत पिंपळगाव बु. ता.पाचोरा जि.जळगाव यांचे वतीने पुढील कामासाठी साहित्य खरेदीकरीता अधिकृत उत्पादक / पुरवठादारांकडुन ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविणेत येत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | आवश्यक वस्तुचे नाव | परीमाण | आवश्यक संख्या/ परीमाण | अनामत रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **१५ वा वित्त आयोग अंतर्गत मौजे पिंपळगाव बु. ता.पाचोरा येथे एल.ई.डी. बल्ब पुरवठा करणे.** | **एल.ई.डी. बल्ब, ISI मार्क, २० वॅट** | **नग** | **९५०.०** | **----/-** | --/- |

**निविदेच्या अटी व शर्ती**

१.वरील साहित्य खरेदी निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेव्दारे **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन करणेत येईल तसेच या निविदेबाबत सर्व सुचना,शुध्दीपत्रके इ. या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिध्द केली जातील.

२.वरील साहीत्य खरेदी निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावर दिनांक १६/०५/२०२६ रोजी ०९.०० वाजेपासुन दिनांक २३/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत अधिग्रहीत (Download) करता येतील.

३.वरील साहीत्य खरेदी निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १६/०५/२०२६ रोजी ०९.०० वाजेपासुन दिनांक २३/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत इलेक्ट्रानिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.

४.ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा **दिनांक २५/०५/२०२६ रोजी १७.००** वा.ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोईनुसार पुढील शक्य त्या दिवशी उघडण्यात येतील.तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा उघडण्यात तीन तासांचा अवकाश असेल.सदर कालावधीत एखादया पुरवठादारास काही निविदा संदर्भात काही अडचण,हरकत असल्यास त्यांनी सरपंच ग्रा.पं. पिंपळगाव बु. ता.पाचोरा यांना लेखी स्वरुपात तक्रार देणे आवश्यक आहे.त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.व सरपंच यांचा निर्णय अंतीम राहील.

५.पुरवण्यात येणा-या सर्व साहित्याची रॉयल्टी,विक्रीकर,आयकर,जीएसटी व शासनाने इतर उपकर व फी भरण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहिल.तसेच साहीत्य कामाच्या ठिकाणी पुरवठादारास पोहच करुन दयावे लागेल. व त्यातील कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठाधारक स्वतः जबाबदार राहिल.त्यामुळे BOQ मध्ये साहित्यांचे दर सर्व करासहीत विचार करून नोंदवावे.

६.मंजूर निवेदेतील साहित्यांचे दर निविदा मंजुर दिनांकापासून २ वर्षापर्यत लागु राहतील.बाजारपेठेत सदर साहित्याचे दर वाढल्यास वाढीव दराची रक्कम ग्रामपंचायत देणार नाही.

७.सदर कामासाठी लागणारे साहीत्य हे शासनाच्या गुणवत्ता मानांकनाप्रमाणे असावे.

८.निविदा मंजूर झालेल्या पुरवठाधारकास आदेशपत्र देण्यापुर्वी रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

९.पुरवठाधारकाने पुरविलेल्या साहित्यांची देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील.मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही.

१०.एकच अथवा सर्वच निविदा कारणे न देता अंशतः /संपुर्ण नाकारणेचा अधिकार प्रशासक/ग्रा.पं.अ. ग्रा.पं. पिंपळगाव बु. ता. पाचोरा यांनी राखून ठेवला आहे.त्याप्रमाणे निविदा का नाकारली याचा खुलासा देखील मागता येणार नाही.

११.निविदा उघडणेपुर्वी साहित्याचा एक नमुना पुरविणेचा आहे. दरपत्रकात नमुद केलेल्या त्या साहित्याच्या तपशिलाप्रमाणे नमुना देणे बंधनकारक राहिल.**नमुना न पुरविलेस निविदा तांत्रिक मुल्यामापनातच अपात्र करणेचे अधिकार ग्रा.पं.स असतील.**तसेच निविदा मंजूरीनंतर नमुन्याप्रमाणे साहित्य पुरवठा केला नाही तर दिलेले आदेश रद्द करणेत येतील. याबाबत संबधिताची कोणतीच तक्रार विचारात घेतली जाणार नाही.नमुन्याप्रमाणे साहित्य न पुरविलेस सदर पुरवठाधारकाची रक्कम देण्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही.

१२.निविदेला मंजूरी मिळालेनंतर मालाचा पुरवठा करणेपुर्वी तयार असणारे साहीत्य पुरवठादाराने कार्यालय सांगेल त्या दिवशी व त्याठिकाणी दाखविणेस ठेवले पाहिजे व ते नमुन्याप्रमाणे असल्याची खात्री झाल्यावर मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यावर ८ दिवसाचे कालावधीत कामाच्या ठिकाणी स्वःखर्चाने पोहोच केले पाहिजे. ग्रामपंचायत कार्यालयाचे प्रतिनिधी साहित्याची तपासणी करतील व त्यावेळी पुरवठादाराने निकृष्ट प्रतिच्या साहित्याचा पुरवठा केला असेल तर ते साहित्य ग्रामपंचायत स्विकारणार नाही व यामध्ये पुरवठाधारकाचे नुकसानीस ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही.यानंतर साहित्य खरेदीस नविन निविदा प्रसिध्द केली जाईल.मुदतीत साहित्य पुरवठा न केलेस प्रति दिन रू.५००/- दंडाची आकारणी केली जाईल.विलंबाने साहित्य पुरवठा केलेस दंडाची रक्कम बिलातुन वजा केली जाईल.

१३.निविदेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत ग्रामपंचायत पिंपळगाव बु. ता.पाचोरा जो निर्णय घेईल तो निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहिल.

१४.निविदेतील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.

१५.लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करुन लिफाफा क्र.१ मध्ये पात्र ठरलेल्या ठेकेदरांचाच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

१६.कोणत्याही अटीवर आधारीत असलेल्या ई निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.अथवा स्विकारल्या तरीही त्या मंजुर केल्या जाणार नाहीत.

१७. सदर पथदिव्यांची १ वर्ष ऑन साईट वॉरंटी दयावयाची असल्याने स्थानिक पुरवठादारांना प्राधान्य देण्यात येईल. **ग्रामपंचायतीला आवश्यक असेल त्याप्रमाणे साहीत्याची उचल करणेत येईल. व त्याप्रमाणे अदायगी करणेत येईल.**

२०.निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांचे सादरीकरण करणे बंधनकारक राहील.खालील प्रमाणे कागदपत्र जोडण्यात यावीत.

**अ) तात्रिक लिफाफा / लिफाफा क्र.१**

- दुकानाची /संस्थेची नोंदणी केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत
- पुरवठादाराचे पॅनकार्ड,
- पुरवठादाराचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र,

**ब) आर्थिक लिफाफा / लिफाफा क्र.२**

- ठेकेदारांनी आपले दर विहीत BOQ मध्ये योग्य त्या जागी भरणा करुन सदरची BOQ अपलोड करावी.प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निविदेचे दर इतर कोठेही नमुद करु नये.

| | |
|---|---|
| **ग्रा.पं.अ.** | **प्रशासक** |
| **ग्रा.पं.पिंपळगाव बु.** | **ग्रा.पं.पिंपळगाव बु.** |
| **ता.पाचोरा जि.जळगाव** | **ता.पाचोरा जि.जळगाव** |

Signature Not Verified
Digitally signed by Sunanda Kailas Kshirasagar
Date: 2026.05.16 06:59:24 IST
Location: Maharashtra-MH